# पुणे परिसर

## 'एन्डॉफ्थाल्मायटिस'वर गडकरी सेंटरतर्फे कार्यशाळा

पुणे, ता. १० : डोळ्याच्या आतील भागात होणारा जंतुसंसर्ग अर्थात 'एन्डॉफ्थाल्मायटिस' या विषयावर 'गडकरी आय सेंटर'तर्फे नुकतेच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दै. 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संपादक प्रतापराव पवार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. पूना आफ्थाल्मॉलॉजिकल सोसायटीसह राज्यभरातून सुमारे दीडशे नेत्रतज्ज्ञ या कार्यशाळेत सहभागी झाले होते. जंतुसंसर्गाच्या अद्ययावत उपायांचा आढावा डॉ. सलील गडकरी यांनी या वेळी घेतला. डॉ. ताराप्रसाद दास, डॉ. श्रीकांत रानडे यांनीही या वेळी आपले विचार व्यक्त केले. डॉ. मोहन जोशी, डॉ. प्रकाश मराठे यांनी स्वागत केले.